# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नांदेड जिल्ह्यातील नांदेड-वारंगा रस्त्यावर पार्डी येथे बांधलेल्या भुयारी पूलाचे बांधकामाबाबत**

**(१) ३६९२ (२२-१२-२०१४). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील नांदेड-वारंगा रस्त्यावर पार्डी येथे सात-आठ महिन्यापूर्वी भुयारी पूलाचे बांधकाम करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर सदर पूल नुकताच पाडण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बांधलेला भुयारी पूल पाडण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर पूलाचे बांधकामासाठी तसेच पाडण्यासाठी किती निधी खर्च झाला आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) विषयांकीत भुयारी पुलाचे बांधकामासाठी मानकांप्रमाणे आवश्यक ती उंची व जोडमार्गाची लांबी ठरविण्यात आली होती. परंतु बांधकामाचे प्रत्यक्ष काम हाती घेतल्यानंतर ग्रामस्थांच्या विरोधामुळे ते थांबिवले. तांत्रिकदृष्ट्या भुयारी पुलाचे बांधकाम योग्य होते.

भुयारी पुलाचे अर्धवट बांधकामामुळे अपघाताचे प्रमाण वाढले होते. तसेच बांधण्यात आलेल्या भुयारी पुलाची उंची व पोचमार्गाची लांबी यापुढे गाव झाकोळून जात होते. त्यामुळे ग्रामस्थांनी उर्वरित बांधकामास विरोध केला व त्यामुळे झालेले बांधकाम पाडण्याचा निर्णय स्थानिकांच्या आग्रही मागणीमुळे जिल्हा नियोजन समिति, नांदेड यांच्या दि. १६/११/२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. सदर निर्णयानंतर अर्धवट भुयारी पुलाचे बांधकाम पाडून रस्ता पूर्ववत करण्यात आलेला आहे. सदर पुल पाडण्यासाठी रु. ७५,००० हजार खर्च करण्यात आलेला आहे.

---

**जाधववाडी (जि.औरंगाबाद) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अडत बाजारात मेथीची गड्डी कमी भावात विकल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान**

**(२) ५८०४ (१०-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाधववाडी (जि.औरंगाबाद) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अडत बाजारात पालेभाज्यांची आवक वाढली असल्याने शेतक-यांना ५० पैशात मेथीची गड्डी विकावी लागत आहे तसेच १३०० मेथीच्या गड्डी अवघ्या १०० रुपयांत कमी भावात विकल्या गेल्याने शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतक-यांनी पाणी कमी असल्यामुळे गहू, ज्वारी, हरभरा ऐवजी पालेभाज्याकडे वळल्याने मेथी काढणीसाठी ४० रुपये शेकडा मजूरी त्यानंतर १००० गड्डी बाजारात आणण्यासाठी ३०० रुपये यामुळे त्यांना यावर्षी आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) होय.

(२) होय.अंशत: खरे आहे. दि.१.१.२०१५ ते ८.१.२०१५ या कालावधीत मेथीची आवश्यकतेपेक्षा अधिक व मोठ्या प्रमाणावर आवक झाल्यामुळे मेथीच्या भावात घसरण झालेली होती. अन्यथा सदर कालावधी वगळता वर्षभरात मेथीला बाजार आवारात चांगला भाव मिळालेला आहे. सद्य:स्थितीत सरासरी ६०० रु. प्रति शेकडा गड्डी असा भाव मिळत आहे.

(३) व (४) मेथी हा नाशवंत माल असल्यामुळे त्यासाठी हमीभाव ठरवून दिलेला नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कांद्याबाबत किमान निर्यात मुल्यासारखे निर्बंध लादु नये या मागणीबाबत**

**(३) ६०२० (१०-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने कांद्याबाबत किमान निर्यात मुल्यासारखे निर्बंध लादु नये यासाठी राज्यशासनाने केंद्राकडे प्रयत्न करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्याचे निर्यात मुल्य ३०० डॉलर प्रतिटन निश्चित केल्यामुळे राज्यातील कांदा निर्यातीत ९० टक्के घट होवून कांद्याच्या दरात घसरण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०५-२०१५)** :(१) नाही.
(२) सद्य:स्थितीत कांद्याचे किमान निर्यात मुल्य ३०० डॉलर प्रति मे टन आहे. मागील वर्षी दुष्काळामुळे कांद्याचे उत्पादन तुलनेने कमी झाल्याने, कांद्याच्या निर्यातीत १५ ते २० टक्क्याच्या दरम्यान घट झालेली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी कांद्याचे दर हे दुप्पटीपेक्षा जास्त आहेत. त्यामुळे कांद्याच्या दरात घसरण झाली आहे, असे म्हणता येणार नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रशासक काम पाहत असलेल्या सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सचिव पॅनेलवरील उमेदवारांना तात्काळ नियुक्त्या देण्याबाबत**

**(४) ६२९५ (१०-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सध्या प्रशासक काम पाहत असलेल्या सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सचिव पॅनेलवरील उमेदवारांना तात्काळ नियुक्त्या द्याव्यात आणि पणन मंडळाच्या आदेशान्वये सचिवांना नियुक्त्या न देणाऱ्या बाजार समित्यांची खातीनिहाय चौकशी करण्याची मागणी दि ९ जानेवारी २०१४ रोजी वा त्यासुमारास सचिवांच्या वेल्फेअर असोसिएशनने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य कृषी पणन मंडळाने सचिवांच्या समस्यांबाबत स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्यांपैकी ५५ बाजार समित्यांवर प्रशासक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास,शासनाकडून सचिवांचे पॅनेल अंतिम करण्याबाबत व रिक्त असलेल्या सचिवांच्या व प्रशासकांच्या जागेवर सचिव पॅनेलवरील उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही. सद्य:स्थितीत ३०५ बाजार समित्यांपैकी १३४ बाजार समित्यांवर प्रशासक कार्यरत आहेत.

(४) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३५ (१) अन्वये बाजार समितीला बाजाराच्या व्यवस्थापनासाठी व अधिनियमातील इतर कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील असे अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्याची तरतूद आहे. परंतु राज्य पणन मंडळ अर्हता व अनुभव यानुसार बाजार समित्यांवर सचिव म्हणून नियुक्त करण्यात यावयाच्या व्यक्तींची यादी तयार करील आणि नाव नोंदणी केलेल्या व्यक्तीच्या यादीतून एका व्यक्तीची सचिव म्हणून नियुक्ती करणे हे बाजार समित्यांवर बंधनकारक असेल, अशी तरतूद आहे. कृषि पणन मंडळाने दि.१७.१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये उपनिबंधक यांना उपरोक्त तरतुदीबाबत कळवून, बाजार समित्यांना व प्रशासकांना त्याप्रमाणे सूचना देण्यास कळविले आहे.

(५) लागू नाही.

---

## राज्यातील १७० कृषि उत्पन्न बाजार समिती बरखास्त करण्याबाबत

**(५) ६७७१ (१०-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १७० कृषि उत्पन्न बाजार समिती दिनांक ७ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास एकत्रित बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतक्या मोठ्या प्रमाणावर समित्या बरखास्त करण्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी केलेल्या चौकशीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) तसेच अशा नियमबाह्य कारभाराला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१), (२), (३) व (४) राज्यातील सुमारे १७० कृषि उत्पन्न बाजार समित्या निवडणूकीस पात्र होत्या. त्यापैकी काही बाजार समित्यांच्या निवडणूका दिर्घ कालावधीपासून प्रलंबित होत्या. याबाबत पणन अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे पणन संचालक, पुणे यांना कळविण्यात आले होते. या बाजार समित्यांच्या निवडणूका तातडीने व निष्पक्ष वातावरणात व्हाव्यात म्हणून संबंधित जिल्हयांच्या उपनिबंधकांनी अशा बाजार समित्यांचे संचालक मंडळाऐवजी शासकीय प्रशासकांची नियुक्ती केली व निवडणूका लवकरात लवकर घेण्यासाठी कार्यवाही सुरु केलेली आहे.

---

**जळगाव जिल्ह्यातील भूसावळ तालुका नशिराबाद टोल नाका बंद करण्याबाबत**

**(६) ८५८३ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नशिराबाद (ता.भुसावळ, जि.जळगांव) टोल नाका बंद करण्याबाबत दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धरणगांव (ता.जि.जळगांव) येथे चांगल्या प्रतीचा कापूस हा कमी भावात खरेदी केला जात असल्याबाबत**

**(७) ९४०६ (१०-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगांव (ता.जि.जळगांव) येथे चांगल्या प्रतीचा कापूस हा ग्रेडरच्या मनमानीने कमी भावात खरेदी केला जात असल्याने दोन शेतक-यांनी हातात पेट्रोल व विषारी पदार्थांची बाटली घेऊन माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) धरणगांव येथील एका जिनिंगमध्ये दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी संक्रातीच्या पूर्वसंध्येला कापूस विकण्यासाठी शेतक-यांनी आणलेला माल शासनाच्या दिलेल्या निर्देशनानुसार कापसाला भाव देण्यास ग्रेडर श्री.एस.ए.गवळी, धुळे एस.डी. जाधव, शिरपूर, डी.पी.ढोक, चोपडा यांनी स्पष्ट केले असूनही चांगल्या प्रतीच्या कापसाला सुध्दा ठरल्याप्रमाणे भाव मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच शेतक-यांची होत असलेली लूट थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०५-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही.

धरणगांव केंद्रावर कापूस खरेदीचे कामकाज करीत असतांना स्थानिक प्रक्रिया संस्थेचे मालक व कापूस व्यापारी हे जास्त आद्रतायुक्त व हलक्या प्रतीचा कापूस घेण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करीत होते.

(३) व (४) सदर केंद्रावर कापूस व्यापारी कापसावर पाणी मारुन तो विक्रीस घेऊन येत होते. कापसामधील ओलावा जास्त असल्याबाबत मॉइश्चर मीटर मधील रिडींग दाखवून देत असल्याने ग्रेडर्सने, कापूस पाहून नियमाप्रमाणे भाव दिला व निर्धारित निकषापेक्षा जादा ओलावा असल्याने कापूस खरेदी केला नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कन्नड, सोयगाव मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम खात्याअंतर्गत कन्नड-चिकलठाणा व इतर नाबार्ड १३ व्या वित्त आयोगातील कामे तातडीने सुरु करणेबाबत**

**(८) ९५७७ (१०-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड, सोयगाव मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम खात्याअंतर्गत मागील ३ वर्षापासून मंजूर असलेले, कन्नड-चिकलठाण व इतर नाबार्ड १३ व्या वित्त आयोगातील कामे तातडीने सुरू करावीत याबाबत मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांना दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) विषयांकित मंजूर कामे तातडीने सुरु करण्यात आली असून काही कामे पूर्ण झाली आहेत व काही पूर्णत्वास नेण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वस्त्रोद्‌योग व यंत्रमागधारकांच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(९) ९५९२ (१०-०४-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वस्त्रोद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अडचणीत आलेल्या सूतगिरणीच्या समस्यासंबंधी एक शिष्टमंडळ मा.वस्त्रोद्‌योग मंत्री यांना दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास भेटले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील अडचणीत आलेल्या वस्त्रोद्योगांच्या समस्या सोडविल्या जाव्यात याकरिता यंत्रमागधारकांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ पासून संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सूतगिरणी, यंत्रमाग व हातमाग यांच्या समस्यांचा विचार करण्यासाठी शासनाने आमदार सुरेश हाळवणकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वस्त्रोद्योग उपाययोजना समितीने आपला अहवाल शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, अहवालातील प्रमुख शिफारशी काय आहेत व त्यानुसार शिफारशींवर कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अडचणीत सापडलेल्या सुतगिरणी व वस्त्रोद्योगाला आधार देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०६-२०१५) :**(१) होय.

दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघाचे शिष्टमंडळ मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांना भेटले आहे.

(२) असे निवेदन वस्त्रोद्योग संचालनालयास प्राप्त झालेले नाही.

(३) होय.

(४) होय.

(५) अ) श्री.हळवणकर समितीने खालील शिफारशी केल्या आहेत.

१) वस्त्रोद्योग विभागाची जिल्हा व तालुका स्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

२) लघु उद्योग व टेक्नीकल टेक्सटाईल मधील मध्यम उद्योगासाठी भांडवली अनुदान देण्यात यावे.

३) व्याज अनुदानात वाढ करण्यात यावी.

४) मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल हब स्थापन करण्यात यावे.

५) साध्या यंत्रमागाचे आधुनिकीकरण करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

६) स्पीनिंग हब स्थापन करावेत.

७) मेगा कॉम्पॉझिट टेक्सटाईल हब स्थापन करावेत.

८) प्रोसेसिंग-कापड प्रक्रिया केंद्र स्थापन करावेत.

९) डिझायनिंग व सॅमपलिंग सेंटर स्थापन करावेत.

१०) स्किल डेव्हलपमेंट सेंटर स्थापन करावेत.

११) आंतरराष्ट्रीय गुंतवणूक वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

१२) हातमाग उद्योगाचे बळकटीकरण करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

१३) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाच्या माध्यमातून यंत्रमाग सहकारी संस्थांची कापड उत्पादन व विक्री वृध्दींगत होण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

१४) यंत्रमाग/वस्त्रोद्योग कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यात यावे.

१५) विज दरात सवलती देण्यात याव्यात.

१६) वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी विविध कायद्यात सुधारणा करण्यात याव्यात इ.

सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१०) १००९७ (१०-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत तत्कालीन संचालक मंडळाची शासनाच्या वतीने सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास सदर चौकशीचा अहवाल प्राप्त करुन शासनाने दोषी संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) कोल्हापूर बाजार समितीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नियुक्त समितीचा अहवाल दि.११.१०.२०१२ रोजी प्राप्त झालेला असून या अहवालाचे आधारे दि.२७.९.२०13 रोजी संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलेले आहे. उपरोक्त अहवालात नमूद केलेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी दि.६.१.२०१५ रोजी एक व्यक्ती न्यायाधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली असून दि.२४.४.२०१५ रोजी एक सुनावणी पार पडली असून पुढील सुनावणी दि.१४.५.२०१५ रोजी ठेवलेली आहे.

---

**अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीतील हंगामी कर्मचाऱ्यांना**
**पूर्व सूचना न देता कामावरुन कमी करण्यात आल्याबाबत**

**(११) १०३५२ (१०-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत गेल्या २० वर्षापासून काम करणा-या हंगामी ४० ते ४५ कर्मचारी यांना कोणतीही पूर्व सूचना न देता तडकाफडकी कामावरुन कमी करण्यात आल्यामुळे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे धडक मोर्चा काढल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कर्मचा-यांना कामावर घेण्याबाबत तसेच त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता कामावरुन कमी करणा-या कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५)** :(१) होय.
(२) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकानुसार रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात आलेली होती. तथापी याप्रकरणी शासनाकडे दाखल अपिलावर दि.२१.०१.२०१५ च्या अंतरीम आदेशान्वये सदरहु कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले आहे. सदर अपिलावरील अंतिम आदेशानंतर पुढील योग्य ती कार्यवाही होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जीनप्रेसमधील कामगारांच्या सेवा अचानकपणे समाप्त करण्यात आल्याबाबत**

**(१२) १०४९९ (१८-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जीनप्रेसमधील कामगारांच्या मागील ३० वर्षापासून सेवेत असलेल्या सेवा अचानकपणे समाप्त करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जीनप्रेस कामगार संघटना गेल्या ११ वर्षे आपल्या मागणीचा पाठपुरावा करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जीनप्रेस कामगारांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सन २००२-०३ पासून कापूस एकाधिकार योजना बंद करुन सीसीआय व अन्य खाजगी खरेदीदारांना कापूस खरेदी परवाने देण्यात आले. त्यावेळी कापसाचे दर जास्त असल्याने कापूस पणन महासंघाकडे किरकोळ खरेदी झाली. त्यामुळे शासनाने काटकसरीचे धोरण अवलंबून ठेका पध्दतीने कामे करुन घेण्याचे निर्देश दिले. त्यामुळे रोजंदारीवरील मजुरांना कामे देणे बंद करण्यात आले. त्यावेळी बरेच कामगार नियत वयोमनानुसार सेवानिवृत्त झाले व काहींनी राजीनामा दिला. कापूस पणन महासंघाची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांच्या सेवा खंडीत करण्यासाठी द्यावयाच्या प्रोत्साहनपर रकमेचा प्रस्ताव शासनाने नाकारला आहे. रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांबाबत न्यायालयाचेही ठोस निर्देश नाहीत. त्याचप्रमाणे कर्नाटक राज्य विरुध्द जी.वि.चंद्रशेखर

खटल्यात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.६.२००९ रोजी दिलेल्या निकालात रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी काम मागण्याचा अधिकार नसल्याचा निर्णय दिलेला आहे. सन २००२-०३ पासून सीसीआय व नाफेडचे सब एजंट म्हणून कापूस पणन महासंघ काम करीत असल्याने त्यांचे निर्देशाप्रमाणे ठेका पध्दतीने कामे करुन घेण्यात येत आहेत व ते बंधनकारक आहे.

---

**सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रावेर मतदारसंघातील कामासाठी वितरित केलेल्या निधीबाबत**

**(१३) १०८५३ (०९-०४-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत रावेर मतदारसंघात माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंत मंजूर कामास किती निधी वितरीत केला व किती निधी बाकी आहे,

(२) असल्यास, उपरोक्त कामांपैकी किती कामे पूर्ण झाली व किती कामे अपुर्ण आहेत,

(३) असल्यास, सदर पूर्ण कामांपैकी अनेक कामे निकृष्ट झाल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०६-२०१५) :**(१) रावेर मतदार संघात सन २०१३-१४ मध्ये विविध लेखाशिर्षातर्गत रु.१५४२.१२ लक्ष खर्च करण्यात आला आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये मार्च, २०१५ अखेर रु.१२८९.०५ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

(२) एकूण मंजूर १०७ कामापैकी ५५ कामे पूर्ण झालेली असून ४२ कामे प्रगतीपथावर आहेत, उर्वरित १० कामे निधी अभावी सुरु करण्यात आली नाहीत.

(३) होय.

(४) सन २०१३-१४ मध्ये ५ कामांची व सन २०१४-१५ मध्ये ३ कामांची दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांच्याकडून तपासणी करण्यात आली असून सदर कामाच्या दर्जाविषयी प्रतिकूल शेरे प्राप्त नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर शहरातील रस्त्यांची झालेली दुरावस्था

**(१४) १०९२१ (०९-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरासह जिल्ह्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून या वाहन चालकांना प्रवास करण्यासाठी लागणा-या रस्त्याची मात्र दुरावस्था झाल्यामुळे वर्षभरात रस्ते अपघातात २५१ जणांचे मृत्यू झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच लातूर व नांदेड मार्गावरील लातूर जिल्हा हद्दीपर्यंतचा रस्ता खड्डेमय झाला असून लातूर ते औसा या मार्गावरील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या अनेक वर्षापासून रखडलेले असून चाकूर तालूक्यातील चापोली नजीक रस्त्याची दुरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू रस्त्याची दुरावस्था त्वरीत दूर करण्याच्या दृष्टीने लातूर ते औसा या मागावरील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१) लातूर जिल्ह्यात वर्षभरात रस्ते अपघातात २४४ जणांचा मृत्यू झाला आहे.

(२) लातूर ते औसा मार्गावरील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणांतर्गत करण्याचे प्रस्तावित होते. परंतू उद्योजकांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर काम रस्ते व पूल विशेष देखभाल दुरुस्ती योजनेतर कार्यक्रमातून हाती घेण्यात येऊन दुरुस्ती व सुधारणा करुन घेण्यात आली आहे.

लातूर ते नांदेड हा राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झालेला असून राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालय सोलापूर येथे सुरु करण्याबाबत

**(१५) १११८२ (०९-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, सातारा, सोलापूर या तीन जिल्ह्यासाठी प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे कार्यालय पुणे येथे आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या तीन जिल्ह्यापैंकी सर्वाधिक साखर कारखाना सोलापूर जिल्ह्यात असल्यामुळे पुणे येथील प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालय सोलापूर येथे सुरु

करण्याबाबतची मागणी सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यावर केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०६-२०१५)** :(१) होय.
(२) सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या दि.२४/१२/२०१४ च्या सभेमध्ये पुणे, सातारा व सोलापूर या जिल्ह्यात एकूण ५८ साखर कारखाने असून सोलापूर जिल्ह्यामध्ये त्यातील ३५ साखर कारखाने असल्याने विभागीय कार्यालय सोलापूर येथे घेण्यात यावे असा ठराव क्र.४५० झालेला आहे.

परंतु सदर ठरावाची प्रत जिल्हा परिषद, सोलापूर यांनी साखर आयुक्त कार्यालयास दि.२/६/२०१५ च्या पत्रान्वये कार्यवाहीस्तव दिली आहे.
(३) व (४) कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

---

## अकोला कृषि उत्पन्न बाजार समितीमधील दिर्घकालीन कार्यरत अस्थायी कर्मचा-यांना सेवेत नियमित करणेबाबत

**(१६) ११६३१ (१०-०४-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला कृषि उत्पन्न बाजार समितीमधील दिर्घकालीन कार्यरत अस्थायी कर्मचा-यांनी सेवेत नियमित करुन घेण्यासाठी शासनाकडे विनंती करुन सुध्दा नियमित केले नाही, हे खरे आहे काय,
(२) राज्यातील कृषि उत्पन बाजार समित्यांमधील अवैध नोकर भरती तात्काळ रद्द करावी असे आदेश पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे ह्यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वैध भरतीस नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५)** :(१) व (२) होय.
(३) व (४) बाजार समितीच्या अस्थायी कर्मचाऱ्यांनी याप्रकरणी शासनाकडे अपिल दाखल केलेले आहे. सुनावणी दरम्यान दि.१३.३.२०१५ च्या अंतरीम आदेशान्वये बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना कमी करण्याच्या आदेशास स्थगिती देण्यात आलेली आहे. अंतिम सुनावणी दि.१३.५.२०१५ रोजी पार पडली त्यावरील आदेश निर्गमित व्हावयाचे आहेत.

---

**देवगांव (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील जॉईट फॉर्मीग सोसायटी लि. येथे झालेला गैरव्यवहार**

**(१७) ११६५९ (०९-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगांव (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील जॉईट फॉर्मीग सोसायटी लि. येथे मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून अनेक बेकायदेशीर व्यवहार सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू सोसायटीचे संचालक मंडळ तात्काळ बरखास्त करुन यावर प्रशासकाची नियुक्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०६-२०१५) :**(१) नाही. संस्थेचे दि.३१.३.२०१४ अखेरचे लेखा परिक्षण झालेले असून लेखी परिक्षणात गैरव्यवहार अथवा अफरातफर झाल्याचे नमूद केलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगांव) कृषि उत्पन्न बाजार समितीने परस्पर होत असलेल्या खरेदी -विक्रीच्या व्यवहाराबाबत**

**(१८) १२३६६ (१०-०४-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) कृषि उत्पन्न बाजार समितीने परस्पर होत असलेल्या खरेदी -विक्रीच्या व्यवहाराला विरोध करण्यासाठी तेथील सुमारे ४०० हमाल माथाड्यांनी दिनांक २ डिसेंबर, २०१४ रोजीपासून "काम बंद" आंदोलन करुन हमाल माथाड्यांसह व्यापारी उपोषणास बसले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार हमाल - माथाडी व्यापा-यांच्या मागणी संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०६-२०१५) :**(१) होय.

(२) बाजार समितीने परस्पर होत असलेल्या शेतमाल खरेदी-विक्रीच्या व्यवहाराबाबत चौकशी केली असता सदर खरेदीदार हे थेट पणन अनुज्ञप्तीधारक असुन नियमानुसारच खरेदी होत असल्याचे आढळून आले. ही वस्तुस्थिती पाहता माथाड्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यांनी “काम बंद” आंदोलन मागे घेतले व बाजाराचे काम सुरळीत सुरु झाले आहे.

---

**पाचोरा (जि.जळगाव) येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या २८ हजार चौरस फुट जागेचा लिलाव होत असल्याबाबत**

**(१९) १२३७३ (१०-०४-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २८ हजार चौरस फुट जागेचा लिलाव करण्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास ठरविले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर लिलाव त्यादिवशी तहकुब करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लिलाव रद्द करण्याची कारणे काय आहेत व तो आता केव्हा घेण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) व (२) होय.
(३) सदर जागेचा लिलाव करुन प्राप्त होणारी रक्कम, बँकेशी तडजोड करुन कर्जफेडीस वापरावयाची होती. तथापी बँकेकडून लिलावाच्या दिनांकापर्यंत तडजोडीबाबत प्रतिसाद न आल्यामुळे तसेच जमीन विक्रीच्या प्राप्त रकमेवर मोठा आयकर भरावा लागणार असल्यामुळे त्यावर विचार करण्यासाठी लिलाव प्रक्रिया थांबविण्यात आली. दरम्यानच्या काळात पणन संचालक, पुणे यांनी सदर लिलावास दि.२०.०३.२०१५ च्या पत्रान्वये चौकशीचे आदेश देवून स्थगिती दिलेली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने जमीन लिलावाबाबत निर्णय घेण्यात येईल.

---

**उदगीर तालुक्यातील (जि.लातूर) कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२०) १२७२५ (१०-०४-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर तालुक्यातील (जि.लातूर) कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) होय.

(२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी उदगीर बाजार समितीच्या दि.१.४.२०११ ते ३१.३.२०१४ या कालावधीच्या तपासणी अहवालावरुन बाजार समितीचे फेरलेखापरीक्षण करण्यासाठी विशेष लेखापरीक्षण करण्यासाठी विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, लातूर यांची दि.४.२.२०१५ च्या आदेशान्वये नियुक्ती केलेली आहे.

(३) उपरोक्त आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२३२५/२०१५ दाखल करण्यात आली असून मा.न्यायालयाने दि.३.३.२०१५ च्या आदेशान्वये स्थिती “जैसे थे” ठेवण्याचे आदेश दिले असून पुढील सुनावणी दि.२५.६.२०१५ रोजी ठेवली आहे.

---

**समुद्रपुर तालुक्यातील (जि.वर्धा) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कापसाची लिलाव पध्दतीने खरेदी होत नसल्याबाबत**

**(२१) १२७५८ (१०-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपुर तालुक्यातील (जि.वर्धा) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कापसाची लिलाव पध्दतीने खरेदी होत नसल्याने अनेक शेतक-यांची मालकांकरवी लुबाडणूक होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक शेतक-यांची आर्थिक फसवणूक थांबविण्याकरिता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात लिलाव पध्दतीने कापूस खरेदी सुरु करावी अशी मागणी शेतक-यांनी समितीकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने तसेच शेतक-यांची फसवणूक थांबविण्याकरिता शासनाने कोणता ठोस निर्णय वा कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) व (२) नाही. माहे नोव्हेंबर, २०१४ पासून सी.सी.आय ची कापूस खरेदी चालू असल्यामुळे व खाजगी व्यापाऱ्यांचे भाव कमी असल्यामुळे शेतकऱ्यांनी सी.सी.आय. यांनाच कापूस विकलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची लुबाडणुक झालेली नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार वा कापूस खरेदी करण्याची मागणी बाजार समितीकडे प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना पाचवा, सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत**

**(२२) १२७६४ (१०-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना पाचवा, सहावा वेतन आयोग लागू करण्याचे निर्देश पणन मंत्री यांनी दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षाच्या या प्रलंबित मागणी मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी शासनामार्फत करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०६-२०१५) :**(१) नाही.

(२), (३) व (४) बाजार समितीने आपले उत्पन्न, खर्च व आस्थापनेवरील खर्चाची टक्केवारी लक्षात घेवून कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घ्यावा अशा सूचना शासनाकडून पूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या सूचनेनुसार हिंगणघाट बाजार समितीने सन २००८ पासून पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे. तथापी हा वेतन आयोग सन १९९६ पासून लागू करावा म्हणून कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. पाचव्या वेतन आयोगाचाच न्यायप्रविष्ट प्रश्न प्रलंबित असल्यामुळे सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेले नाही.

---

**आकोट तालुक्यात (जि.अकोला) कापूस उत्पादनात घट आल्याने कापसाचे चुकारे (धनादेश) मिळण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(२३) १२७९७ (१०-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट तालुक्यात (जि.अकोला) कापूस उत्पादनात घट आल्याने पणन महासंघाकडून अधिकचे बोनस न मिळता कापसाचे चुकारे (धनादेश) मिळत असून सदर धनादेश जिल्हा बँक व स्थानिक बँकेमार्फत वटण्यास विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आल्याने शेतक-यांना आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धनादेश मिळाल्यानंतर स्थानिक बँक, जिल्हा बँकांना धनादेश त्वरीत वठवून रक्कम देण्यास विलंब करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू धनादेश त्वरीत बँकेने वठवून पैसे शेतकऱ्यांना देण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

अकोट येथे कापूस पणन महासंघाने कापूस खरेदी केलेली नाही. येथील कोणत्याही शेतकऱ्याची धनादेश उशिराने वटल्याबाबतची तक्रार कापूस पणन महासंघाच्या अकोला विभागीय कार्यालयात अद्यापही प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या पुष्पनगर भागात असलेले भुखंड महानगरपालिकेने काही वर्षापूर्वी संपादित केल्याबाबत.**

**(२४) १३२३० (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील पुष्पनगर भागात असलेला भुखंड महानगरपालिकेने काही वर्षापूर्वी संपादित केला होता, त्याची किंमत एक कोटी अठरा लाख रुपये निश्चित केली होती. परंतू मूळ मालकास मोबदला न देता, दुसऱ्याच व्यक्तीला मोबदला देण्यात आला, त्यावर मूळ मालकाने आक्षेप घेतला त्यामुळे महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षकांनी चौकशी केली असता, त्यात १३ अधिकाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले, दिनांक १३.०३.२०११ ला सादर केलेल्या चौकशी अहवालावर आयुक्तांनी पुन्हा चौकशी समिती नेमली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळांत या जमिनीची मालकी कोणाची आहे जमीन संपादित करतेवेळी प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना संपादनाची घाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संपादनाच्या वेळी सदर भुखंड एका राजकीय पक्षाच्या नेत्याच्या नावांवर होता व या पी.आर. कार्डावर मालकी हक्कांत कोणाची नोंद आहे, त्यामुळेच संपादनाची घाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या व्यक्तीला मोबदला देण्यात आला त्या व्यक्तीचे नांव मालकी हक्कात नाही म्हणून मोबदल्याची रक्कम महानगरपालिकेने त्यांच्याकडून वसुली केली काय,
(५) असल्यास, या प्रकरणातील दोषी मालकावर व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली व त्या भुखंडाचा उपयोग महानगरपालिका कोणत्या कारणासाठी उपयोगात आणणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) विशेष भूसंपादन अधिकारी यांच्यामार्फत संपादीत झालेल्या भूखंडाच्या आखीव पत्रिकेवरील नोंदीनुसार जमीनीचे मिळकतधारक पुढीलप्रमाणे आहेत.

(१) श्री.रमेशलाल गोविंदराम गुनवाणी, (२) श्री.शंकरलाल गोविंदराम गुनवाणी, (३) श्रीमती लताबाई भ्र.शंकरलाल गुनवाणी, (४) श्री.भगवान रेवाचंद मुलचंदानी, (५) श्री.प्रेमचंद रेवाचंद मुलचंदानी, (६) श्रीमती शांती गोपीचंद्र गुनवणी, (७)(अ)मनोज पिता गोपीचंद गुनवाणी, (ब)मनेश गोपीचंद गुनवाणी, (८) सौ.रेखा शिरीष चौधरी, (९) श्री.रंगनाथ आसाराम पाटील.

(४) औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे संबंधिताविरुध्द महानगरपालिका न्यायालयात रिकव्हरी सूट दाखल केला आहे आणि विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांना देखील शासन स्तरावरुन रिकव्हरी सूट दाखल करणेविषयी कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रस्तावाशी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांबाबतची तसेच संपूर्ण प्रस्तावाची सखोल चौकशी करण्याचे निदेश दिनांक ०६/११/२०१५ अन्वये शासनाकडून विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांना देण्यात आले आहेत.

तसेच सदर भूखंड विकास योजना आरक्षण क्रमांक ८७ व ८८ प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षीत असल्याने त्याचा वापर त्याच कारणासाठी महानगरपालिकेकडून येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड अंतर्गत सन २००८ ते २०१३ या कालावधीत मोठया प्रमाणावर अतिरिक्त मंजूर बाबी ( Extern Item Rate List) व खंड-३८ अंतर्गत वाढीव परिणामास मंजूरी देण्यात आल्याबाबत**

**(२५) १३२३५ (०९-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड अंतर्गत सन २००८ ते २०१३ या कालावधीत मोठया प्रमाणावर अतिरिक्त मंजूर बाबी (Extern Item Rate List) व खंड-३८ अंतर्गत वाढीव परिणामास मंजूरी देण्यात आल्या आहेत तसेच चुकीच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड अंतर्गत कोट्यावधी रुपये रक्कमेच्या अतिरिक्त बाबी मंजूर केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले असल्याबाबत कॅगने लेखा परिक्षणात आक्षेप घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

कामाच्या आवश्यकतेनुसारच करारनाम्यातील तरतूदीनुसार अतिरिक्त बाबी व खंड-३८ अंतर्गत वाढीव परिणाम मंजूर करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि महालेखापाल कार्यालयाकडून विभागाच्या वार्षिक तपासणी वेळी आक्षेप घेतले असून, आक्षेपांची पूर्तता करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महींदळे रोड (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील रा.मा.क्र. १५ वर कॅनालवरील पुलावर संरक्षण कठडे बांधण्याबाबत**

**(२६) १३४१४ (१८-०४-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महींदळे रोड (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील रा.मा.क्र. १५ वर पाटावरील पुलांना कठडे नसल्याने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अपघातात तीन तरुणांना जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नालाबंदी तांडा (ता.भडगांव, जि.जळगांव) कॅनालवरील बांधकाम अरुंद असल्याने व कठडे नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार या परिसरातील रस्त्यावरील कॅनालवर तातडीने संरक्षण कठडे बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापही यासाठी कोणत्याच उपाययोजना केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सदर अपघात हा पुलावर झालेला नसून पुलापासून ५० मी. अंतरावर झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अपघात टाळण्याच्या दृष्टीन सुरक्षेसाठी सूचना फलक, रिफ्लेक्टर्स, कठडे बांधकाम इ. उपाययोजना आवश्यकतेनुसार वेळोवेळी करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर मधील सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांकडून अजूनही वारणी वसुल करण्यात येत असल्याबाबत**

**(२७) १३४४६ (१०-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर मधील सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांकडून अजूनही वारणी वसुल करण्यात येते असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, या चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५)** :(१) अंशतः खरे आहे.
(२) शेतकऱ्यांकडून वारणी वसूल केल्याचे दिसून आल्यास ती रक्कम संबंधित आडत्याकडून वसूल करुन संबंधित शेतकऱ्यास परत दिली जाते. श्री.नागनाथ शरणप्पा बणजगोळे, आडते यांनी श्री.चन्नवरी मोरडे यांच्या कांदा विक्री हिशोबपट्टीत वारणी रक्कम आकारल्याचे दिसून आल्याने सदर रक्कम आडत्याने शेतकऱ्यास परत दिली आहे. सदर शेतकऱ्याने तक्रार नसल्याबाबत बाजार समितीस लेखी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील १४ सहकारी संस्थेच्या निवडणूका बेकायदेशीररित्या झाल्याबाबत**

**(२८) १३४५५ (१०-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील १४ सहकारी संस्थेच्या निवडणूका बेकायदेशीररित्या झालेल्या आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०६-२०१५)** :(१) नाही.
(२) होय.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ क ब नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणामार्फत घेण्यात येतात. प्राधिकरणास प्राप्त तक्रार अर्जावर विभागीय सहनिबंधक, पुणे यांना चौकशी करण्याच्या सूचना प्राधिकरणाने दिल्या होत्या. त्यानुसार त्यांचा अहवाल प्राप्त झाला असून तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांनी आपला प्रतिनिधी स्वत: पाठविण्याबाबत**

**(२९) १३४५७ (१०-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीमध्ये कृषी मालाचे खरे उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार नसल्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांनी आपला प्रतिनिधी स्वत: कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पाठविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याअंतर्गत नियम, १९६७ मध्ये शेतकऱ्यांनी थेट मतदान करण्याची तरतूद नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लासलगाव व येवला (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यामार्फत कांदयावर प्रक्रिया करुन उपउत्पादने तयार करणारे उद्योग निर्माण करण्याबाबत**

**(३०) १३६०१ (१०-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव व येवला (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत कांदयावर प्रक्रिया करुन उपउत्पादने तयार करणारे उद्योग निर्माण करण्यासाठी शासनाने विशेष आर्थिक सहाय्य देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०६-२०१५) :**(१) नाही. लासलगांव व येवला (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत कांद्यावर प्रक्रिया करणारे उद्योग नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पणन प्रक्रिया संस्थांकडून भागभांडवलाची परतफेड योग्यप्रकारे होण्यासाठी त्या संस्थेची मालमत्ता व संचालक मंडळाच्या प्रत्येक सदरस्यांची वैयक्तिक मालमत्ता संस्थेने शासनाकडे तारण ठेवणे बंधनकारक करणेबाबत**

**(३१) १३८२५ (१०-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पणन प्रक्रिया संस्थांकडून भागभांडवलाची परतफेड योग्यप्रकारे होण्यासाठी त्या संस्थेची मालमत्ता व संचालक मंडळाच्या प्रत्येक सदस्यांची वैयक्तिक मालमत्ता संस्थेने शासनाकडे तारण ठेवणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अटीमुळे पणन संचालनालयात गेल्या ७ महिन्यापासून १२ कोटी रुपये पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भागभांडवल वितरणाबाबत योग्य ते मार्गदर्शन शासन करणार आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०६-२०१५) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे. दि.७.४.२०१५ च्या शासन निर्णय अन्वये संस्थेस शासनाने वितरण केलेल्या रकमेच्या २०% इतकीच वैयक्तिक मालमत्ता आता संचालकांनी तारण ठेवावयाची आहे.

(२) व (३) होय, दि.७.४.२०१५ च्या शासन निर्णय अन्वये शासनाने संस्थेस वितरीत केलेल्या रकमेच्या २०% इतकीच संचालकांची वैयक्तिक मालमत्ता तारण ठेवण्याचे आदेश निर्गमित केल्यानंतर ५ संस्थांनी २०% मालमत्ता तारण ठेवून त्यांच्या पहिल्या हप्त्याच्या रकमेची उचल केलेली आहे.

---

**सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यातून कर्नाटक राज्याला जोडणा-या मुख्य रस्त्याची कामे अद्यापपर्यंत पूर्ण झाली नसल्याबाबत**

**(३२) १४१०२ (१०-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यातून कर्नाटक राज्याला जोडणा-या मुख्य रस्त्याची कामे अद्यापपर्यंत पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच मिरज तालुक्यातील मिरज-बेडग-आरग-लिंगनुर-बेळंकी-सलगरे, मिरज-एरंडोली-बेळंकी-सलगरे, काकडवाडी फाटा-सुभाषनगर-म्हैसाळ रस्त्याच्या कामाचा समावेश सन २०१४ च्या विशेष दुरूस्ती योजनेअंतर्गत (S.R.) समावेश करून मंजुर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्ररामा ०६ येथील मिरज पंढरपुर रोड-सुभाषनगर-टाकळी फाटा-मिरज आरग क्रॉस रोड (प्रजिमा ४५) -विजयनगर-म्हैशाळ ते महाराष्ट्र राज्य सिमेपर्यंतचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या कामांना सन २०१४ च्या विशेष दुरूस्ती योजनेअंतर्गत समावेश करून निधी मंजूर करून सदर रस्त्याचे काम सुरू करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मिरज तालुक्यातील (जि.सांगली) कर्नाटक राज्याला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची कामे लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरहू रस्त्याची कामे केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०६-२०१५)** :(१), (२), (३), (४), (५) व (६) हे अंशत: खरे आहे.

सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यातून कर्नाटक राज्याला जोडणारे प्रजिमा-४५, प्रजिमा-४१, रा.मा.१५३ व प्रजिमा-५७ हे मुख्य रस्ते आहेत.

प्रजिमा-४५ (१५ कि.मी.) प्रजिमा-४१ (१३.८०० किमी), रा.मा.-१५३ (५ किमी) व प्रजिमा-५७ (३८.२०० किमी) अशा एकूण ७५.८०० कि.मी. लांबीपैकी ९.८०० कि.मी. लांबीतील कामे विविध योजनेंतर्गत पूर्ण करण्यात आली असून ३३.६२५ कि.मी. लांबीतील कामे विविध योजनेतंर्गत मंजूर असून प्रगतीत आहेत. उर्वरीत ३२.३७५ कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची असून, या लांबीत काही ठिकाणी पडलेले खड्डे भरुन वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत विभागाकडे उपलब्ध अनुदानातून प्रश्नाधीन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच या रस्त्यांपैकी मजबुतीकरण व डांबरीकरण आवश्यक असलेल्या रस्त्यांची कामे निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू (जि.परभणी) यांचेकडून बीओटी तत्त्वावर व्यापारी गाळे बांधण्यात आल्याबाबत

**(३३) १४४६५ (१०-०४-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू (जि.परभणी) यांचेकडून बीओटी तत्त्वावर व्यापारी गाळे बांधण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती गाळे बांधण्यात आले, गाळेवाटप करताना कोणते निकष ठरविण्यात आले,
(३) तसेच गाळे वाटप करताना सर्व गाळेधारकांकडून अनामत रक्कम घेण्यात आली आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(४) ज्या गाळेधारकांनी अनामत रक्कम भरलेली नाही त्या गाळ्यांचा फेर लिलाव करण्याबाबत

शासनाची भूमिका काय आहे व या अनियमितता करणा-या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५)** :(१) नाही. कृषि उत्पन्न बाजार समिती सेलु येथे आतापर्यंत बांधण्यात आलेले सर्व गाळे समितीच्या स्वनिधीतून, रितसर परवानग्या घेवून बांधण्यात व बाजार समितीच्या नियमानुसार अनामत रक्कम घेवून वाटण्यात आलेले आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिंतूर (जि.परभणी) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहाराबाबत**

**(३४) १४४६७ (१०-०४-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या लेखापरिक्षण अहवालातील शेरे, गाळे, भूखंड वाटप अग्राम रक्कम, बाजार फी व देखरेख खर्च, कर्मचा-यांचे वेतन याबाबींमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला आहे किंवा कसे याबाबत स्वतंत्र चौकशी करण्यासाठी विशेष लेखा परिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था (फिरते पथक) यांच्याकडे दिनांक २ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास चौकशीचे काम देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीचे काम पूर्ण करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५)** :(१) होय.
(२) नाही.
(३) चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अहवाल प्राप्त होताच त्यामधील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**मुबंईतील व्यापा-यांच्या असोसिएशनने मेटल उद्योग गुजरातला स्थलांतरीत करण्याचा घेतलेला निर्णय**

**(३५) १६५६९ (०६-०९-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गुलाबराव पाटील**

**(जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांना भेटल्यानंतरही काहीच निर्णय न झाल्यामुळे, विक्रीकर विभाग, इन्स्पेक्टर व अन्य यंत्रणांकडून होणा-या त्रासामुळे तसेच व्यापा-यांच्या मागण्यांचे निवेदन दिले असतांना त्यावर कोणताच निर्णय न घेतल्यामुळे मेटल उद्योग गुजरातला स्थलांतरीत करण्याचा निर्णय उद्योजकांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील वडाळा येथील पेटंट डिझाइन आणि ट्रेडमार्क महानियंत्रक कार्यालय मुंबईतून दिल्लीत स्थलांतरीत करण्याच्या आदेशाचे पत्र माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास केंद्र शासनातर्फे पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय, तसेच, सदरचे कार्यालय दिल्ली येथे स्थलांतरीत करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील सुमारे २००० मेटल इंडस्ट्रिजने आपले व्यवसाय बंद करुन गुजरात राज्यात जाण्याचा निर्णय घेतलेला असून त्यांच्याकडे सुमारे ६०० कोटी रुपयांच्या कराची थकबाकी असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त उद्योजकांकडे सुमारे ४५० कोटी रुपयांचा विक्रीकर आणि त्यावरील व्याज व दंड थकीत असून थकीत करावरील व्याज व दंड माफ करण्यासाठी व्यापारी शासनावर दबाव आणत आहेत, हे ही खरे आहे काय, तसेच सदर इंडस्ट्रीजच्या स्थलांतरणामुळे हजारो कोटींचे नुकसान होऊन ५० हजार कामगार बेरोजगार होणार असून मा.मुख्यमंत्र्यांच्या मेक इन महाराष्ट्र या घोषणेला धक्का बसलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पालघर येथील पोलिस ॲकॅडमी प्रकल्प गुजरात येथे स्थलांतरीत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय, तसेच मुंबई परिसरातील केंद्रीय आस्थापनांची मुख्यालये मुंबईबाहेर स्थलांतरीत होऊ नये यासाठी मा.उद्योग मंत्री यांनी मा.मुख्यमंत्री महोद्यांकडे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,असल्यास, प्रश्न भाग १,२,३,४ ,५ च्या बाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) मुंबईतील वडाळा येथील पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्क महानियंत्रक कार्यालय मुंबई येथेच कार्यान्वित आहे.

केंद्र शासनाने सदर कार्यालयात भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

(३) मुंबई मेटल असोसिएशन यांचे काही उद्योग गुजरात राज्यात स्थलांतरित होत असल्याबाबतची वस्तुस्थिती नाही.

(४) हे खरे नाही.

(५) राष्ट्रीय मरीन पोलिस अ‍ॅकॅडमी गुजरात मध्ये स्थापन करण्याचे नियोजित आहे.

मुंबई परिसरातील केंद्रीय आस्थापनांची मुख्यालये मुंबईबाहेर स्थलांतरीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**नागपूर-मुंबई एक्सप्रेस हाय-वे वर पिंपळगाव परिसरातील रस्त्याची पुनर्बांधणी करण्याबाबत**

**(३६) १६५७४ (३१-०७-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई एक्सप्रेस हाय-वे लातूर स्टेशनच्या अलिकडे असलेल्या पिंपळगाव या गावाच्या परिसरात एक कि.मी.अंतरापर्यंत हा महामार्ग एखाद्या खेड्यातील अंतर्गत रस्ता असावा इतका दयनिय झाला आहे, येथे हा रस्ता पुर्णपणे उखडला असून मोठमोठे दगड वर आले आहेत, त्यामुळे रात्री अंधारात येथे अपघात होत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या पिंपळगाव परिसरातील रस्त्याची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :**(१), (२) व (३) सदर रस्ता लांबीत अपघात होत आहेत हे खरे नाही. नागपूर-मुंबई एक्सप्रेस हायवे लातूर स्टेशनच्या अलीकडे असलेल्या पिंपळगाव गावाच्या परिसरात किमी ३४/६६० ते ३५/४६० या लांबीतील काम अंशत: खराब झालेले होते. सदर अंशत: खराब झालेल्या कामाची दुरुस्ती, दोष निवारण कालावधीमध्ये करण्यात आली असून सध्या रस्ता सुस्थितीत आहे.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील चौपदरीकरणाबाबत**

**(३७) १६९२० (०५-०९-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सदा सरवणकर**

**(माहिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईहून गोव्याकडे जाण्यासाठी वाहनचालकांच्या दृष्टीने सोईस्कर असलेल्या मुंबई-गोवा महामार्गावर गेल्या पाच वर्षात सुमारे २ हजार ९७३ अपघात झाले असून यात ६८५ जणांना जीव गमवावा लागल्याची धक्कादायक माहिती माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच या महामार्गावरील पनवेल ते इंदापूर टप्प्यात होणारी वाहतूकीची कोंडी, अपघात, अतिवृष्टी इत्यादी अडचणी येवू नयेत म्हणून २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणासाठी अडथळा ठरत असलेल्या कर्नाळा अभयारण्यातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने मंजूरी दिल्याने मुंबई-गोवा चौपदरीकरणाचा अडथळा दूर झाल्याचे दिनांक ४ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे तसेच सदर कामाच्या आराखडयाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी सुमारे ६७,९४७ पळस, वड, केळी, आंबा इत्यादी झाडे तोडण्यात येणार असल्याने पर्यावरणाची हानी होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) उक्त, मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन सदर महामार्गातील चौपदरीकरणाची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच, सदर प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला संबंधित प्रकल्पग्रस्तांना देण्यात आला आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच किती कालावधीत उक्त जमिनींचा मोबदला संबंधित प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१२-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) पनवेल ते इंदापूर या टप्प्यात पळस्पे या ठिकाणी वाहतूकी संदर्भात काही समस्या उद्भवल्यास, २४ तासाकरीता पोलीस हेल्पलाईन कार्यान्वीत असल्याचे पोलीस अधीक्षक (मुख्यालय) वाहतूक यांनी कळविले आहे. तसेच, प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या सवलतकाराने वाहतूक मदत केंद्र बांधून सक्षम प्राधिकाऱ्याकडे हस्तांतर करण्याची तरतूद निविदेमध्ये समाविष्ट असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(३) मुंबई-गोवा रा.म.क्र ६६ (जुना १७) या पनवेल ते इंदापूर (०/०० ते ८४/००) या लांबीचे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

सदर लांबीपैकी कर्नाळा अभयारण्यामधून प्रश्नांकित रस्त्याचा एकूण २०.१० कि.मी. लांबीचा भाग जातो. त्यापैकी १६.५० कि.मी. पर्यावरण संवेदनशील भागातून जाणाऱ्या लांबीतील चौपदरीकरणाकरीता या कामाचे सवलतकरास सदर लांबी हस्तांतर करण्यात आलेली आहे. उर्वरित लांबीची परवानगी पर्यावरण मंत्रालय यांच्या विचाराधीन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(४) मुंबई-गोवा मार्गाच्या चौपदरीकरणामध्ये पनवेल ते इंदापूर ०/०० ते ८४/०० कि.मी. या लांबीमध्ये १०५०९ झाडे, कि.मी. ८४/०० ते १६१/०० या लांबीच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये सल्लागाराने दिलेल्या अहवालानुसार ७७३९ झाडे बाधित होत आहे. तसेच कि.मी. १६१/०० ते ४५०/१७० या लांबीमध्ये २६३२६ झाडे, अशी एकूण ४४५७४ झाडे बाधित होत आहेत.

सदर लांबीच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये बाधित होणाऱ्या झाडांसाठी वन विभागाकडून सूचविलेल्या पटीत वृक्षांची लागवड करुन पर्यावरणाचा समतोल राखण्याची उपाययोजना करण्याचे नियोजित आहे.

(५) सदरील लांबी केंद्र शासनाच्या एनएचडीपी (राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम) मध्ये समाविष्ट असल्याने स्वतंत्रपणे तरतूद करण्याची आवश्यकता नाही. तसेच चौपदरीकरणांचे कामाकरीता भूसंपादनाची कार्यवाही सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहे.

(६) व (७) पनवेल ते इंदापूर चौपदरीकरणाच्या प्रकल्पासाठी एकूण २०५.५ हे. जमीन संपादीत करावयाची असून आजमितीस १९७.१६ हे. जमिनीचा निवाडा झालेला आहे. त्यापैकी १७६.९२ हे. जमीन प्रत्यक्ष ताब्यात घेण्यात आलेली आहे. जमीन संपादीत करण्याकरीता एकूण रु.३०४.७० कोटी अपेक्षित असून त्यापैकी रु. २५४.८६ कोटी रुपयांचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण पनवेल यांनी कळविले आहे.

---

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील दहिवेल येथील कान नदीवरील दहिवले-चिंचाडा या गावांना जोडणा-या पुलाच्या बांधकामाबाबत

**(३८) १७०८९ (०३-०८-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील दहिवेल येथील कान नदीवरील दहिवले-चिंचाडा या गावांना जोडणा-या पुलाचे बांधकाम सुरु असताना संबंधित ठेकेदारास शासनाकडून अद्यापपर्यंत निधी उपलब्ध होऊ न शकल्याने पुलाचे बांधकाम थांबले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील अनेक गावांना जोडणा-या पुलाच्या बांधकामासाठी शासनाने निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१) होय. अंशतः खरे आहे.
(२) संबंधित ठेकेदाराने सदरचे काम माहे मे, २०१५ मध्ये पूर्ण केलेले असून सदर पुलावरुन वाहतूक सुरळीत सुरु असून दहिवेल-चिंचपाडा ही दोन्ही गावे जोडली गेलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील कार्ला फाटा ते अदमपूर फाटा या मार्गावरील हिप्परगा थडी ते दौलापूर रस्त्याचे असलेले निकृष्ट दर्जाचे बांधकाम**

**(३९) १७१२० (१७-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील कार्ला फाटा ते अदमपूर फाटा या मार्गावरील हिप्परगा थडी ते दौलापूर या १ कि.मी. अंतराच्या रस्त्याचे डांबरीकरण अतिशय निकृष्ट झाले असून अवघ्या दोन महिन्यात रस्ताची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उपरोक्त रस्त्याच्या कामाची चौकशी करुन संबंधित गुत्तेदारांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.
सदर रस्त्याच्या कामासाठी कार्यारंभ आदेश दि. १८.४.२०१३ रोजी निर्गमित करण्यात आले असून सद्य:स्थितीत काम सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर मार्फत प्रगतीत आहे व काम पूर्ण करण्याची मुदत दि. ३१.१२.२०१५ पर्यंत आहे. तसेच सदर रस्त्यांचे झालेले काम सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत चालू आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आसेगाव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील आसेगाव चौफुली ते माळीवाडापर्यंतच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याबाबत**

**(४०) १८०६४ (१३-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आसेगाव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील वाळुंज ते लांझी औद्योगिक वसाहतीलगत व मुंबई हायवे पासून ३ कि.मी. अंतरावर असलेल्या आसेगाव चौफुली ते माळीवाडापर्यंतच्या

रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्यामुळे ग्रामस्थ, कामगार, विद्यार्थी व प्रवाशी यांचे हाल होत असल्याने लोकप्रतिनिधींनी वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिका-यांकडे निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६)** :(१) होय.
(२) विचाराधीन रस्त्याच्या जवळ औद्योगिक वसाहत व रेल्वे कंटेनर यार्ड असल्यामुळे अतिजड वाहनांची रहदारी आहे. त्यामुळे सदर रस्त्यावर वारंवार खड्डे पडतात. तथापि सदर रस्त्यावर डांबर मिश्रीत खडीने खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे. सदर रस्त्याच्या कामाकरिता मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पात रु. ७०.०० लक्ष मंजूर आहेत. सदर कामाचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेच्या स्तरावर असून काम हाती घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील रस्त्याची व पूलांची कामे निधीअभावी बंद पडली असल्याबाबत

**(४१) १८८८९ (१४-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील रस्त्याची व पूलांची बरीचशी कामे निधीअभावी बंद पडली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती रस्त्यांची व पूलांची कामे बंद पडली आहेत तसेच ही कामे त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६)** :(१) विषयाधीन कामांना निधीची तरतूद कमी असल्याने कामाची गती मंद झाली आहे.
(२) व (३) श्रीगोंदा तालुक्यातील योजनांतर्गत ५०५४(०३) राज्यमार्ग अंतर्गत रस्त्यांची व पुलांची सहा (६) कामे, ५०५४ (०४) जिल्हा व इतर मार्ग अंतर्गत रस्ते व पुलांची दहा (१०) कामे प्रगतीत असून सद्य:स्थितीत सदर कामांना निधीच्या तरतुदी कमी असल्यामुळे कामे करण्याची गती मंदावली आहे.

विषयाधीन कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्यात येतील.

---

## निफाड (जि.नाशिक) येथील पिंपळगांव बसवंत कृषी उत्पन्न बाजार समितीत झालेला गैरव्यवहार

**(४२) १९१८३ (२३-०९-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) येथील पिंपळगाव (ब) बाजारसमितीच्या भ्रष्ट व गैरकारभाराबाबत तसेच अवैध नोकर भरती बाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१२ व त्यानंतर देखील लेखी निवेदना व्दारे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे तसेच पणन संचालक, पुणे आणि प्रधान सचिव, सहकार व पणन वस्त्रोद्योग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) निफाड (जि.नाशिक) येथील पिंपळगांव बसवंत कृषी उत्पन्न बाजार समितीत गैरव्यवहार निदर्शनास आल्यामुळे सदर बाजार समितीचे सन २००५ ते २०१३ कालावधीतील कामकाजाचे लेखापरीक्षण विशेष लेखा परिक्षकाकडून करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास व त्या नंतर वारंवार केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयाचा अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०१-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीच्या आधारे पिंपळगाव कृषि उत्पन्न बाजार समितीस खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि, बाजार समितीचा खुलासा समाधानकारक नसल्यामुळे व बाजार समितीच्या निधीचा दुरुपयोग झाल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्यामुळे, नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम ५३ अन्वये सहायक निबंधक, सहकारी संस्था येवला यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून दि. १८.११.२०१५ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच नोकर भरतीबाबत त्रुटींची पुर्तता करुन बाजार समितीने सादर केलेल्या फेरप्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता दिलेली आहे.

---

**शिंदी येथील नदीवरील (ता.भडगांव,जि.जळगांव) जामदा कालवा व पुलाव्यतिरिक्त चार पूलांची अवस्था दयनीय झाल्याबाबत**

**(४३) १९७५० (०७-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदी येथील नदीवरील (ता.भडगांव,जि.जळगांव) जामदा कालवा व पुलाव्यतिरिक्त चार पूलांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जीर्ण व दुरवस्था झालेल्या पूलांच्या जागी नव्याने पुल बांधण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, सदरचे पुलाची पुनर्निमितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) जलसंपदा विभागाचे विषयाधीन कालव्यावरील पूल अरुंद आहे. परंतु सदरचा पूल वाहतुकीस सुस्थितीत आहे. रस्त्याच्या दर्जानुसार कॅनॉल स्ट्रक्चर्स पुनर्बांधणी/रुंदीकरण करण्यासाठी जलसंपदा विभागाकडे पत्रव्यवहार सुरु आहे. मंजूरी मिळाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील.

---

**उदगीर तालुक्यातील (जि.लातूर) चांदेगाव येथील रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४४) २०१८७ (३०-०७-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर तालुक्यातील (जि.लातूर) चांदेगाव या ठिकाणी हाती घेतलेले पूलाचे काम रेंगाळले असून सदर पूलालगत असलेल्या दुतर्फा रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने या संपूर्ण कामाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उपभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर, मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, इत्यादींकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, सदर कामाची दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून तपासणी करण्यात येत आहे.

(३) तपासणी अवाल प्राप्त झाल्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर - बिदर रोड ते तगरखेडा या रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(४५) २०१८८ (०७-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीमावर्ती भागातील लातूर - बिदर रोड ते तगरखेडा या रस्त्यांची मागील २ वर्षापासून अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने काही ठिकाणी वाहतूकच बंद आहे तसेच खराब रस्त्यामुळे या मार्गावरील एसटी महामंडळाच्या अनेक फेऱ्या बंद करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरहू रस्त्याचे विनाविलंब मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे म्हणून त्या परिसरातील ग्रामस्थांनी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, लातूर जिल्हा आदींकडे मागील १ वर्षापासून सातत्याने मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याच्य मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणाचे काम आजमितीस हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर कामे विनाविलंब पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात आले असून वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

(४) लातूर बिगर ते तगरखेडा या २ किमी लांबीच्या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम योग्य त्या योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यातील ताकई-आडोशी येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४६) २०९५३ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यातील ताकई-आडोशी रस्ता काही महिन्यांपूर्वी रस्त्याचे काम केलेले असून पावसाळ्यात या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) तसेच नियमावलीप्रमाणे रस्त्याचे काम न करणा-या कंत्राटदारांवरही कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०१-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याच्या मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१२-१३ मध्ये करण्यात आले असून या रस्त्यावर अति अवजड वाहनाच्या वाहतूकीमुळे व अतिवृष्टीमुळे काही प्रमाणात खड्डे पडले होते.

(३) सदर रस्त्यावरील पावसाळ्यामध्ये पडलेले खड्डे डांबर व खडीने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर-कळंब रस्त्यावरील रेल्वे क्रॉसींग जवळील मंजुर असलेले पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(४७) २१०४० (१३-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर-कळंब रस्त्यावरील रेल्वे क्रॉसींग जवळील मंजुर असलेले पुलाचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग लातूर यांचेकडे निवेदनाद्‌वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती व सदर काम सुरु करण्याबाबत शासनास किती कालावधी लागेल ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :** (१) होय.

(२) सदरील काम हे रेल्वे खाते व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या समन्वयाने करावयाचे असून मुख्य पुलाचे काम रेल्वे खात्यामार्फत व पोचमार्गाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात येणार आहे. हया पुलाच्या सर्वसाधारण मांडणी आराखडयास मंजुरी मिळाली असुन रेल्वे खात्यामार्फत मुख्य पुलाचे अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(३) रेल्वे खात्यामार्फत मुख्य पुलाच्या अंदाजपत्रकाचे काम पूर्ण होताच त्यांच्याकडे निधी डिपॉझिट करुन काम सुरु करुन घेण्यात येईल व त्याचबरोबर पोच रस्त्याचे बांधकाम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्यात येईल.

---

## तांदुळजा ते टाकळगाव (जि.लातूर) या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४८) २१०४९ (३१-०७-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांदुळजा ते टाकळगाव (जि.लातूर) या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व पुनश्च रस्ता दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सदर रस्ता काळया मातीच्या भागातून जात असल्याने व माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे किमी २०/०० ते २४/०० या लांबीतील काही भागामध्ये खड्डे पडले होते. ते कंत्राटदाराकडून भरुन घेण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरसोली-चाळमळा व माणकुळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील जोड रस्त्याच्या कामाबाबत

**(४९) २१३२७ (१४-०९-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरसोली-चाळमळा व माणकुळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील १५ वर्षे अर्धवट स्थितीत असलेला जोड रस्ता तातडीने पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियोजनाअभावी उक्त जोडरस्त्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०१-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) माणकुळे पुल :- पोच मार्गाच्या भूसंपादनासाठी ग्रामस्थांनी विरोध केला यास्तव काम करणे शक्य झाले नाही.

वरसोली पुल :- सदर पुलाच्या जोडरस्त्यासाठी मोजणी करणेबाबत तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, अलिबाग यांना कळविण्यात आले असून मोजणी पूर्ण झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अष्टविनायक यात्रा मार्गाचा राष्ट्रीय मार्गात समावेश करण्याबाबत

**(५०) २१९२४ (०३-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अष्टविनायक यात्रा मार्गाचा राष्ट्रीय मार्गात समावेश करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अष्टविनायक यात्रा मार्गाचा राष्ट्रीय मार्गात समावेश करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १३६ (37)

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०१-२०१६) :** (१) होय.
(२) अष्टविनायक यात्रा मार्गाचा राष्ट्रीय मार्गात समावेश करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.